**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाला.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहात एकही माननीय मंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती** : आता माननीय मंत्री आले आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्री आता आले आहेत.

**सभापती** : माननीय मंत्री माझ्या दालनात होते. मी त्यांना सांगितले की, आता मी सभागृहात जाणार आहे. त्यामुळे आता ते आले आहेत. आता आपण नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय घेत आहोत.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

**सभापती** : आपण बोलावे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, एका अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आम्ही अधिवेशनाच्या सुरुवातीला मुद्दा मांडत आहोत.

**सभापती** : आपण काय मांडत आहात ते मला समजलेले नाही.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. नवाब मलिक आजही या राज्याचे मंत्री आहेत. उद्या आम्ही येथे *** खात्याच्या संदर्भात प्रश्न विचारले ***

**सभापती** : नाही.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, ***

**सभापती** : मी आता पुढील कामकाजाकडे वळणार आहे. नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावित घोषणा देत वेलमध्ये येतात.)

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : सदस्यांचा परिचय

ॲड अनिल परब (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, कोल्हापूर स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातर्फे निर्वाचित झालेले श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातर्फे निर्वाचित झालेले श्री. राजहंस सिंह यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातर्फे निर्वाचित झालेले श्री. सुनील गोविंद शिंदे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

----

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे.

उप सचिव (श्री. तारवी) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले अभिभाषण छापावे.)

----

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देतच असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी वेलमधून आसनावर जाऊन बसावे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सन्माननीय सदस्यांना जागेवर जाऊन बसावयास सांगावे.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर जाऊन बसतात.)

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, ***

**सभापती** : आपले बोलणे रेकॉर्डवर येणार नाही. आता "अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे" हे कामकाज घेण्यात येत आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावित घोषणा देत वेलमध्ये येतात.)

**सभापती** : हे जे काही चालले आहे त्याला मी परवानगी देणार नाही.

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.** : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक-१, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अध्यादेश, २०२२ सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक-२, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२ सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देतच असतात.)

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय द्यावा.

**सभापती** : हे सर्व जर थांबणार असेल तर तुम्हाला एक मिनिट बोलण्यास परवानगी देईन. पण तुम्ही जो विषय मांडला आहे तो कोणत्याही नियमात बसत नाही. त्यामुळे ते रेकॉर्डवर येणार नाही. आपण सन्माननीय सदस्यांना आसनावर जाऊन बसावयास सांगावे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी आपला मनापासून आभारी आहे. मी फक्त दोन मिनिटांत माझे म्हणणे मांडतो. ***

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : तो विषय होणार नाही. आपण दुसऱ्या विषयामधून ....

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, ***

**सभापती** : मी रुलिंग दिले आहे की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण रेकॉर्डवर येणार नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

ॲड अनिल परब : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली आहे का ?

**सभापती** : होय.

ॲड अनिल परब : सभापती महोदय, मग त्याला अनुमोदन द्यावे लागेल.

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावित घोषणा देत वेलमध्ये येतात.)

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मला बोलू द्यावे ....

**सभापती** : मी आपणास त्या विषयावर बोलावयास परवानगी देणार नाही.

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात.)

**पृ.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन

**मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. अभिजीत वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो. :-

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

श्री. शशिकांत शिंदे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी अनुमोदन देत आहे.

डॉ. मनिषा कायंदे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी अनुमोदन देत आहे.

**सभापती** : प्रस्ताव असा आहे की :-

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

या प्रस्तावावर शुक्रवार, दिनांक ०४ मार्च व शनिवार, दिनांक ०५ मार्च, २०२२ रोजी चर्चा घेण्यात येईल.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देतच असतात.)

असुधारित प्रत

**सभापती ....**

या प्रस्तावास ज्या सन्माननीय सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या आज गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत तळ मजला, आवक कक्ष, विधान भवन, मुंबई तसेच e2.council.mls@gmail.com या ई-मेलवर सादर कराव्यात.

----

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देतच असतात.)

**पृ.शी./मु.शी**. : सन २०२१-२०२२ करिता खर्चाचे पुरवणी विवरणपत्र सादर करणे.

श्री. शंभुराज देसाई (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१-२०२२ करिता खर्चाचे पुरवणी विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०३ (३) आणि २०५ मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी सन २०२१-२०२२ च्या खर्चाच्या पुरवणी विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन २०२१-२०२२ मधील खर्चाचे पुरवणी विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरण पत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणाव्दारे वितरीत करण्यात येत आहेत. सदर प्रकाशन विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

----

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देतच असतात.)

**पृ.शी.** : सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक.

**मु.शी.** : सन २०२१ चे वि.स.वि.क्रमांक-३९, महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ च्या संबंधात माननीय राज्यपाल यांच्याकडून आलेला संदेश.

**सभापती** : माननीय राज्यपाल यांच्याकडून एक संदेश आलेला आहे. उप सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

उप सचिव (श्री. तारवी) : सभापती महोदय, सन २०२१ चे वि.स.वि.क्रमांक-३९, महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ च्या संबंधात माननीय राज्यपाल यांच्याकडून प्राप्त झालेला दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजीचा संदेश पुढीलप्रमाणे आहे.

The Maharashtra Co-operative Societies (Third Amendment) Bill, 2021 for assent of the Hon'ble Governor under Article 200 of the Constitution of India.

Reconsider the amendment proposed to section 157 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, in the Bill.

----

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावित घोषणा देतच असतात.)

**सभापती** : अधिवेशनाचा आजचा पहिला दिवस आहे. तुम्ही पहिल्यांदा विषय मांडला तेव्हाच मी तुम्हाला सांगितले होते की, आजचा दिवस शोक संदेशाचा आहे. त्यामुळे मी हा विषय घेणार नाही. भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यासारख्या महान व्यक्तिचा शोक संदेश असताना आपण या स्वरुपाची वागणूक करीत आहोत.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, ***

**सभापती** : *** तुम्हाला उद्याचा दिवस आहे. त्यामुळे तुमचे कोणतेही बोलणे रेकॉर्डवर .... हा विषय सोडून तुम्हाला बोलायचे असेल तर तुम्हाला दोन मिनिटे दिली होती. त्या वेळेमध्ये तुम्ही बोलला आहात. हा विषय मी मान्य करणार नाही.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आपण मला सांगितले होते की, मी दोन मिनिटे देतो. आपण माईक सुरु करावा.

**सभापती** : ती तांत्रिक बाब माझ्या हातात नाही.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, ही मुस्कटदाबी चालली आहे. आपण आमचा माईक सुरु करावा.

नंतर श्री. खर्चे

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावीत वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

**पृ.शी.:/मु.शी.:** विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : विधानपरिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

उप सचिव (श्री.तारवी) : (अ) विधानपरिषदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

१) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक २०२१

२) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

३) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२१

४) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ विधेयक, २०२१

(ब) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली :

१) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावीत वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

उप सचिव (श्री.तारवी)……..

२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१

३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१

४) सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक २२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१

५) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२१

६) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

७) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१

८) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

९) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१

१०) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावीत वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

उप सचिव (श्री.तारवी)……..

११) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२१

१२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) विधेयक, २०२१

१३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

१४) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२१

१५) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१

१६) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२१

१७) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) विधेयक, २०२१

१८) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक २०२१

१९) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावीत वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

उप सचिव (श्री.तारवी)……..

२०) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२१

२१) सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ विधेयक, २०२१

----------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावीत वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

असुधारित प्रत

**पृ.शी.:/मु.शी.:** अशासकीय विधयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

श्री.विलास पोतनीस (कार्यकारी समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण १५० मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. तसेच प्राथम्यक्रमानुसार बॅलटमध्ये आलेले ३ अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव

१) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक -१, ५० मिनिटांपेक्षा जास्त नाही.

२) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक-२१, ५० मिनिटांपेक्षा जास्त नाही.

३) श्री.गोपीचंद पडळकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक-११०, ५० मनिटांपेक्षा जास्त नाही.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

श्री.विलास पोतनीस : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी.:/मु.शी.:** सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती :** मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम ८ (१) अन्वये खालील सदस्यांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :

(१) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.

(२) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

(३) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

(४) श्री.रामदास आंबटकर, वि.प.स.

---------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकावीत वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

असुधारित प्रत

**पृ.शी.** : शोक प्रस्ताव

**मु.शी.** : भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता दिनानाथ मंगेशकर, उद्योगपती राहुल कमलनयन बजाज, श्री. रामनिवास सत्यनारायण सिंह, वि.प.स., सर्वश्री. नारायण ज्ञानदेव पाटील, सुधीर गजानन जोशी, माजी वि.स.स. व माजी मंत्री, श्री. दत्तात्रय एकनाथ लंके, माजी. वि.प.स., श्रीमती संजीवनी हरी रायकर, श्रीमती आशाताई मारोतीअप्पा टाले व श्रीमती कुमुद माधव रांगणेकर, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**सभापती** : भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता दिनानाथ मंगेशकर, उद्योगपती राहुल कमलनयन बजाज, श्री. रामनिवास सत्यनारायण सिंह, वि.प.स., सर्वश्री. नारायण ज्ञानदेव पाटील, सुधीर गजानन जोशी, माजी वि.स.स. व माजी मंत्री, श्री. दत्तात्रय एकनाथ लंके, माजी. वि.प.स., श्रीमती संजीवनी हरी रायकर, श्रीमती आशाताई मारोतीअप्पा टाले व श्रीमती कुमुद माधव रांगणेकर, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते.

(विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सभात्याग केला)

भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता दिनानाथ मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदोर येथे झाला.

मास्टर दिनानाथ मंगेशकर यांच्या स्वर्गीय संगीताचा वारसा घेऊन जन्माला आलेली मंगेशकर भावंडे ही भारताच्या आणि मराठीच्या ललाटीची वैभवच आहेत. लता मंगेशकर या वैभवाच्या शिरोमणी होत्या. प्रत्येक लहानसहान गोष्टींमध्ये परिपूर्णतेचा ध्यास, गाण्याची उपजत समज असली तरीही कठोर मेहनतीची तयारी या सर्व सामर्थ्यातून त्यांनी स्वकर्तृत्वाने संगीताचे अवघे आकाश व्यापून टाकले होते. लता मंगेशकर नावाच्या सात अक्षरी सप्तस्वरांनी गेली आठ दशके जगभरातील संगीत प्रेमींचे, सामान्यांचे भावविश्व समृध्द केले आहे. पन्नासच्या दशकापासून पुढील सर्व

असुधारित प्रत

**सभापती.....**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात प्रवेश करतात)

पिढया दीदींच्या स्वरवैभवाची श्रीमंती सांगतच जगणार आहेत. हिंदी-मराठी तसेच इतर अनेक भाषांमध्ये चित्रपट गीतांच्या पलीकडे दीदींच्या स्वरांचे साम्राज्य जेवढे मोठे होते तेवढेच ते तेजस्वीही होते. त्यांनी गायलेली "मीरेची भजने", "राम-श्याम गुणगाण", "ज्ञानेश्वरांच्या विराण्या", "संतांचे अभंग" अशी शेकडो गाणी भारतीयांच्या जगण्याचा भाग झाली आहेत. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे पसायदान दीदींनी आपल्या स्वर वैभवाने लाखो लोकांना अर्पित केले आहे.

कै. लता मंगेशकर यांनी केवळ संगीत क्षेत्रात कार्य केले असे नाही तर त्यांनी सामाजिक बांधीलकी जपत अनेक गोर-गरीब तसेच संकटात सापडलेल्यांना मदतीचा हात दिला आहे. पुण्यामधील पानशेत धरण पूरग्रस्तांसाठी मदत, चीन आक्रमणाच्या वेळी राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी मदत, बाबा आमटे यांच्या आनंदवनासाठी मदत, कारगील युध्दाच्या वेळी जवानांसाठी मदत अशी अनेक उदाहरणे देता येतील. मंगेशकर कुटुंबियांचे दातृत्व सर्वज्ञात आहे.

कै. लता मंगेशकर या सन १९९९ ते २००५ या कालावधीत राज्यसभेच्या नामनियुक्त सदस्या होत्या. त्यांना असंख्य पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. १९६९ साली भारत सरकारने त्यांना "पद्मभूषण", १९९९ साली "पद्मविभूषण" तर २००१ साली सर्वोच्च समजला जाणारा 'भारतरत्न' हा किताब देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सन १९८९ मध्ये त्यांना भारतीय चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च 'दादासाहेब फाळके पुरस्कार' प्रदान करण्यात आला. संगीत क्षेत्रातील अनेक पुरस्काराने त्यांना सन्मानीत करण्यात आले होते. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, हैद्राबाद, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांनी त्यांना मानद "डि. लिट." पदवी प्रदान केली होती.

असुधारित प्रत

**सभापती......**

अशा या असामान्य, महान, अद्भूत, अद्वितीय, केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील संगीत प्रेमींच्या मनावर 'अधिराज्य' गाजविणाऱ्या स्वरसम्राज्ञीचे रविवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कै. राहुल कमलनयन बजाज यांचा जन्म १० जून, १९३८ रोजी पश्चिम बंगालमध्ये कलकत्ता येथे झाला. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून अर्थशास्त्राची पदवी, मुंबई विद्यापीठातून कायद्याची पदवी तसेच हार्वर्ड बिजनेस स्कूलमधून एम.बी.ए. पदवी संपादन केली होती. आयआयटी सह सात विद्यापीठांनी त्यांना मानद डॉक्टरेट बहाल केली होती.

कै. बजाज यांनी १९६५ मध्ये बजाज समुहाची सूत्रे हाती घेतली. बजाज समुहाला पाच दशकांहून अधिक काळ भारतीय औद्यागिक क्षेत्रात आघाडीवर ठेवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली बजाज औद्यागिक समुहाने यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत. दुचाकी वाहनांच्या निर्मितीमध्ये बजाज समुहाने 'हमारा बजाज' ही संकल्पना प्रत्येक घराघरात आणि प्रत्येकाच्या मनामनात रुजविली. ऑटोमोबाईल म्हणजे वाहन क्षेत्रात बजाज उद्योगाने क्रांती घडवून आणली. बजाज उद्योग समुहाने दुचाकी बरोबरच तीनचाकी रिक्षा बाजारात आणल्या. त्यामुळे देशातील कोट्यावधी बेरोजगार तरूणांना रोजगार मिळाला. पुण्याशेजारी पिंपरी आणि औरंगाबाद मधील वाळुंज औद्योगिक क्षेत्रात 'बजाज ऑटोच्या' आधाराने अनेक लघु उद्योग बहरले. कै. बजाज यांनी अर्थव्यवस्थेची पावले ओळखत वाहन उद्योगाच्या पलिकडे जाऊन विमा, वित्त पुरवठा, घरगुती उपकरणे, इलेक्ट्रिक आणि पवन उर्जा अशा विविध क्षेत्रांमध्ये बजाज उद्योगाचा पाया विस्तारला. कै. बजाज यांनी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, भारतीय उद्योग महासंघ अशा विविध संघटनांचे अध्यक्षपद भूषवून उद्योग क्षेत्राचे नेतृत्व केले. "बुलंद भारत की बुलंद तस्वीर, हमारा बजाज" हीच त्यांची ओळख होती. देशभक्ती, उद्योगावरील निष्ठा आणि विकासासाठी दृष्टी हीच त्यांची खरी 'श्रीमंती' होती. केवळ व्यवसायाकडेच लक्ष न देता त्यांनी सामाजिक बांधिलकीही जपली. जमनालाल

**सभापती.....**

बजाज फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी शाळा, आयटीआय, ग्रामीण महिलांना रोजगार प्रशिक्षण अशा कार्यात भरघोस वाटा उचलला. 'दातृत्व' हे बजाज उद्योग समुहाचे मूळ वैशिष्ट्य आहे.

उद्योग आणि व्यापार क्षेत्रांतील महत्वपूर्ण कामगिरीबद्दल कै.बजाज यांना सन २००१ मये भारत सरकारने "पद्मभूषण" पुरस्काराने सन्मानित केले होते. "नाईट (knight) ऑफ द नॅशनल ऑर्डर ऑफ द लिजन ऑफ ऑनर " हा फ्रान्सचा सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना प्राप्त झाला होता. सन २००६ मध्ये ते राज्यसभेवर निर्वाचित झाले होते.

अशा या देशाच्या औद्योगिक जडणघडणीमध्ये मोठे योगदान देणाऱ्या, द्रष्ट्या व समाजभिमुख उद्योगपतीचे शनिवार दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

या नंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

**सभापती........**

कै.रामनिवास सत्यनारायण सिंह यांचा जन्म दिनांक १ जानेवारी, १९४८ रोजी उत्तर प्रदेशमधील गोरखपूर जिल्ह्यातील भरौली येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.एस्सी. पर्यंत झाले होते.

कै.सिंह यांनी उत्तर भारतीय संघ, मुंबई, रामसखी रामनिवास चॅरिटेबल ट्रस्ट, पानादेवी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून उत्तम कार्य केले होते. 'दैनिक हमारा महानगर'चे संपादक म्हणूनही त्यांनी काम केले होते. मुंबईतील अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै.सिंह हे सन २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे रविवार, दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कै.नारायण ज्ञानदेव उर्फ एन.डी.पाटील यांचा जन्म दिनांक १५ जुलै, १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ढवळी येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., एल.एल.बी. पर्यंत झाले होते.

कै.पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाचे सदस्य, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संस्थापक, सातारा येथील बाबासाहेब आंबेडकर अकादमीचे अध्यक्ष तसेच, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून उत्तम कार्य केले होते.

कै.पाटील यांनी अनेक जनआंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांनी महाराष्ट्र सीमाप्रश्न चळवळ, कोल्हापूर टोल विरोधी कृती समिती तसेच, महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नेतृत्व केले होते. शेतकरी कामगार पक्षाने केलेल्या विविध आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता.

असुधारित प्रत

**सभापती........**

कै.पाटील सन १९६० ते १९६६, १९७० ते १९७६ व १९७६ ते १९८२ या कालावधीत महाराष्ट्र विधानपरिषदेचे तर १९८५ ते १९९० या कालावधीत महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य होते. त्यांनी ऑगस्ट, १९७८ ते फेब्रुवारी,१९८० या कालावधीत सहकार खात्याचे मंत्री म्हणून उत्तम कार्य केले होते. त्यांनी आपल्या मंत्री पदाच्या कालावधीत कापूस खरेदी एकाधिकार योजनेची यशस्वी अमंलबजावणी करून शेतकऱ्यांच्या कापसाचे पैसे तात्काळ मिळण्याची सोय करून शेतकऱ्यांमध्ये या योजनेची विश्वासार्हता वाढविली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठाने त्यांना मानद डि.लिट. पदवी प्रदान केली होती. गेली सहा दशके महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात आपल्या कर्तृत्वाचा अमीट ठसा उमटविणाऱ्या तसेच, वंचित, शोषित, कष्टकरी जनतेसाठी अविरतपणे कार्य करणाऱ्या या कर्मयोग्याचे सोमवार, दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कै.सुधीर गजानन जोशी यांचा जन्म दिनांक २५ मे, १९४० रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.एस्सी पर्यंत झाले होते.

कै.जोशी यांनी नव बालोद्यान ट्रस्ट, साने गुरुजी विद्यालय, दादर सार्वजनिक वाचनालय तसेच, जाणीव प्रतिष्ठान मुंबईचे अध्यक्ष म्हणून उत्तम कार्य केले होते. त्यांनी राष्ट्रीय शिक्षक कल्याण प्रतिष्ठान राज्य कार्यकारी समिती, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ तसेच, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते.

कै.जोशी यांनी स्थानिक लोकाधिकार समितीचे अध्यक्ष, सी.के.पी. को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक, वनिता समाज दादरचे सल्लागार तसेच, शिवाई सेवा ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्य केले होते. अनेक कामगार संघटनांचे नेतृत्व त्यांनी केले होते. सर्वसामान्य जनतेच्या शैक्षणिक, सामाजिक व नोकरी संदर्भातील

**सभापती........**

अडचणींबाबत पुढाकार घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले होते.

कै.जोशी हे सन १९६८ ते १९७७ या कालावधीत मुंबई महानगरपालिकेचे सदस्य, १९७३-७४ मध्ये मुंबईचे महापौर व काहीकाळ विरोधी पक्षनेता होते. ते १९८५, १९९१ व १९९८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. जुलै १९९३ ते जुलै १९९४ या कालावधीत महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते होते. त्यांनी १९९५ ते १९९९ या कालावधीत महसूल, खार जमिनी व शालेय शिक्षण खात्याचे मंत्री म्हणून उत्तम कार्य केले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कै.दत्तात्रय एकनाथ लंके यांचा जन्म निनांक २ डिसेंबर, १९२९ रोजी बुलढाणा जिल्ह्यात चिखली येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., बी.एड. पर्यंत झाले होते.

कै.लंके यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या विदर्भ विभागाचे संघटन मंत्री, शिक्षक परिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्य केले होते. त्यांनी आदर्श विद्या प्रसारक संघाचे प्रांत प्रतिनिधी, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव म्हणूनही कार्य केले होते.

कै.लंके सन १९७८ मध्ये विदर्भ विभाग शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे सोमवार दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

असुधारित प्रत

**सभापती........**

कै.संजीवनी हरी रायकर यांचा जन्म दिनांक १८ सप्टेंबर, १९३५ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथे झाला. त्यांचे शिक्षण एम्.ए., एम्.एड्. पर्यंत झाले होते.

कै.रायकर यांनी सुरुवातीस मुंबईतील बाल मोहन विद्या मंदिर येथे अध्यापनाचे कार्य केले होते. त्यांनी रायकर स्मृती ट्रस्ट तसेच वात्सल्य ट्रस्टची स्थापना करुन अनाथ, गरीब विद्यार्थ्यांना मदत केली. त्यांनी जनसहकार्य सहकारी पतपेढी तसेच, जनकल्याण सहकारी बँकेच्या संचालिका म्हणूनही उत्तम कार्य केले होते.

कै.रायकर यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक आंदोलनात सहभाग घेतला होता. त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या कार्याध्यक्षा, अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक महासंघाच्या उपाध्यक्षा, अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षक महासंघाच्या महिला प्रमुख तसेच, मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक, शिक्षकेत्तर महासंघाच्या अध्यक्षा म्हणून उत्तम कार्य केले होते.

कै.रायकर या सन १९८८, १९९४ व २००० मध्ये मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाल्या होत्या.

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे शनिवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कै.आशाताई मारोतीअप्पा टाले यांचा जन्म दिनांक १ जानेवारी, १९३१ रोजी ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे झाला. त्यांचे शिक्षण दहावी पर्यंत झाले होते.

कै.टाले यांनी हिंगोली नगरपरिषदेच्या सदस्या तसेच, नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या सिनेट सदस्या म्हणूनही उत्तम कार्य केले होते. हिंगोली मतदारसंघातील अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. हिंगोलीच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

**सभापती........**

कै.टाले सन १९६४ ते १९७० या कालावधीत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्या तर सन १९७२ मध्ये हिंगोली मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाल्या होत्या. विधानमंडळाच्या अनेक समित्यांवर त्यांनी काम केले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे शुक्रवार, दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी दु:खद निधन झाले.

कै.कुमुद माधव रांगणेकर माझ्या ओळखीच्या होत्या. क्रिकेटर खंडू रांगणेकर यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांची मुले माझे मित्र आहेत.

कै.कुमुद माधव रांगणेकर यांचा जन्म दिनांक २९ ऑगस्ट, १९२९ रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण एम्.ए. पर्यंत झाले होते.

कै.रांगणेकर यांनी काहीकाळ अध्यापनाचे कार्य केले होते. त्यांनी दीनदयाळ शोध संशोधन संस्था तसेच, कमर्शिअल इन्स्टीटयुट असोसिएशनाच्या संस्थापिका-अध्यक्षा म्हणून कार्य केले होते. त्यांनी ज्योती विद्या मंदिर, आदर्श विद्या मंदिर तसेच, नेताजी सुभाष हायस्कुलच्या संस्थापिका-अध्यक्षा म्हणूनही कार्य केले होते. त्या देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या संस्थापक सदस्या होत्या.

कै.रांगणेकर ह्या सन १९७८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाल्या होत्या.

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे गुरुवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात.)

असुधारित प्रत

**सभापती........**

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकूल कुंटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ८ मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजीच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत